

# डॉ. छाया महाजन : परिचय

- डॉ. छाया महाजन, साहित्यिका, कादंबरीकार, कथाकार, चरित्रकार, ललितगद्य व बालवाङ्मय लेखिका, कवयित्री, अनुवादक, व्याख्याती, अभिवाचक व कोशकार म्हणून प्रसिद्ध आहेत.
- यांच्या मातोश्री स्व. सिंधूताई भालेराव, आजोबा स्व. शंकरराव खांदाट व सासरे स्व. वैद्यभूषण तात्यासाहेब महाजन हे तिघेही हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिक आहेत.
- त्या इंग्रजी विषयात एम.ए., पीएच्.डी. आहेत व शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रात कार्यरत आहेत. औरंगाबादमधील डॉ. इं.भा.पा. महिला कॉलेजच्या त्या प्राचार्य होत्या. इंग्रजीच्या प्रपाठक व विभागप्रमुख, एम.फिल. व पीएच.डी. च्या मार्गदर्शिका म्हणून त्या काम करत आहेत.
- बनारस हिंदू विश्व विद्यालयाच्या मेंबर ऑफ लॉर्डस् म्हणून त्यांनी काम केलेले आहे.
- साहित्य अकादमीच्या English Literary Dictionary च्या मराठी विभागात त्यांनी संपादन साहाय्य केले आहे.
- जालना येथे १७, १८ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या मराठवाडा लेखिका संमेलनाच्या अध्यक्षा होत्या.
- हायकोर्ट, औरंगाबाद येथे लोकन्यायालयाच्या सदस्य म्हणून काम केले आहे.
- अनेक सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांच्या त्या सक्रिय पदाधिकारी आहेत आणि सामाजिक कार्यात त्यांचा सहभाग आहे.

**आजपर्यंत त्यांची एकूण ४२ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.**

- **५ मराठी कादंबऱ्या** – कॉलेज, मानसी, तन अंधारे, होरपळ, डोईचा पदर आला खांद्यावरी
- **७ कथासंग्रह** – मुलखावेगळा, यशोदा, नकळत, ओढ, एकदश कथा, राहिलो उपकाराइतुका, अज्ञात
- **६ ललित गद्यसंग्रह :** मोरबांगडी, पाण्यावरचे दिवे, दशदिशा, गगन जीवन तेजोमय, कोलावरी डी, चंद्राचे तुकडे
- **५ बाल वाङ्मय :** इवलेसे रोप, भोवरा, फुलाच्या गोष्टी, रक्ताच रंग एक, विजय आमचाच होईल
- **२ चरित्र लेखन :** राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील, ए.पी.जे. अब्दूल कलाम
- **१२ भाषांतरे :** आजीची वाणी – स्वच्छ जंगलाची कहाणी – ४ पुस्तकांचा संच, मुलांचे प्रेमचंद ३ पुस्तके, निळया डोळ्यांचा माणूस, हरझॉग, डिफेमेशन ॲण्ड डिस्पोलिएशन ऑफ इंडिया, रविंद्रनाथ टागोर यांच्या नाटिका, स्मारक शिळा
- **२ इंग्रजी पुस्तके :** विमेन इन पॉल स्कॉटस नॉव्हेल्स, इन्सपायरिंग जर्नी : श्रीमती प्रतिभा देवसिंह पाटील
- **३ हिंदी अनुवादीत कादंबऱ्या :** मानसी, तन अंधारे, कॉलेज
- कुमारांसाठी ए.पी.जे. अब्दूल कलाम तसेच ललित कथा या Audiobooks- Storytel या ॲपवर आलेल्या आहेत. तसेच काही ebooks प्रकाशित झालेली आहेत. SahityaChhaya या यू ट्यूब चॅनल वर १०० पेक्षा जास्त व्हिडिओ.

**प्रदान करण्यात आलेले पुरस्कार :**

- 'नकळत' या लघुतम कथासंग्रहासाठी महाराष्ट्र शासन 'उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार' – १९९२
- स्वामी रामानंद तीर्थ गौरव सन्मान पुरस्कार (साहित्य) – सप्टेंबर २००३.
- सामाजिक, शैक्षणिक साहित्यासाठी 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा भूषण पुरस्कार' – सप्टेंबर २००४
- मराठी वाङ्मयासाठीचा 'स्वातंत्र्यसेनानी विनायकराव चारठाणकर पुरस्कार' – नोव्हेंबर २००४.
- 'कॉलेज' या कादंबरीसाठी महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक संचनालय, मुंबई 'वि.स. खांडेकर पुरस्कार' – २००७
- 'मानसी' या कादंबरीसाठी 'अंकुर वाङ्मय पुरस्कार' – २००९
- महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे तर्फे दिला जाणारा 'कृष्णाजी वामन कीर श्रेष्ठता पुरस्कार' 'पाण्यावरचे दिवे' या ललितगद्यास – २०१२
- पुणे मराठी ग्रंथालयातर्फे दिला जाणारा 'राजेंद्र बनहट्टी पुरस्कार' – 'राहिलो उपकारा इतुका' या कथासंग्रहास – १८ जानेवारी २०१४
- बडोदा (गुजरात) येथील 'अभिरुची गौरव पुरस्कार', 'राहिलो उपकारा इतुका' या कथासंग्रहास – २०१४
- सन्मान कृतज्ञता स्नेहालय, अहमदनगर – २०१६
- 'होरपळ' या कादंबरीसाठी 'वसंतराव दांदळे स्मृती पुरस्कार' – २२ जानेवारी २०१७
- जोत्स्ना देवधर लेखिका – 'विशेष ग्रंथकार पुरस्कार', पुणे – २६ मे २०१९
- वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव (कर्नाटक) यांचा 'ललितगद्य पुरस्कार', 'गगन जीवन तेजोमय' या पुस्तकास – ८ जून २०१९
- सूर्योदय सर्वसमावेशक मंडळ, जळगाव यांचा 'सौ. लिलाबाई दलिचंद जैन सूर्योदय बाल साहित्य पुरस्कार' – ८ मार्च २०२०
- मराठी साहित्य मंडळ, ठाणे तर्फे 'राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार' 'चंद्राचे तुकडे' या ललितगद्यला – २०२२
- महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे यांचा 'महाकवी कालिदास प्रज्ञावंत लेखक पुरस्कार' – जुलै २०२२
- 'लायन्स द्रोणाचार्य ॲवार्ड', लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद (मेट्रो) शैक्षणिक कार्यासाठी – १६ सप्टेंबर २०२२
- स्व. सौ. कांताबाई भवरलाल जैन 'सेवारत्न' पुरस्कार द्वारा सर्वोदय सर्व समावेशक मंडळ, जळगाव – २७ नोव्हेंबर २०२२
- महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे यांचा 'महाकवी कालिदास लक्षवेधी पुरस्कार' – १९ जून २०२३
- साहित्य विहार, नागपूर तर्फे 'सर्वोत्कृष्ट लेखिका पुरस्कार' ललित लेखनासाठी 'चंद्राचे तुकडे' या ललितगद्य संग्रहाला – २१ ऑक्टोबर, २०२३

# वैयक्तिक माहिती

| | | |
|---|---|---|
| नाव | : | डॉ. सौ. छाया भवान महाजन |
| पत्ता | : | 'चेतन', कल्याणी नर्सिंग होम, न्यू समर्थनगर, औरंगाबाद- ४३१ ००१. |
| फोन | : | (०२४०) २३३१९१२, भ्रमणध्वनी : ९८२३२५५९०२, ९४२३१८५९०३ |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी, इंग्रजी |
| शैक्षणिक पात्रता | : | बी.ए. इंग्रजी (मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. गुणवत्ता यादीत दुसरी)<br>एम.ए. इंग्रजी (मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. गुणवत्ता यादीत दुसरी)<br>डी.एच.ई (मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. गुणवत्ता यादीत दुसरी)<br>पीएच्.डी. - पॉल स्कॉटच्या द कादंबरीतील स्त्री व्यक्तिमत्त्व<br>(डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) |
| प्रकल्प ( विद्यापीठ अनुदान मंडळ, दिल्ली ) | : | मराठवाड्यातील वाङ्‌मयीन अभिरुचीचा तौलनिक अभ्यास. |
| राष्ट्रभाषा प्रवीण | : | महाराष्ट्रात प्रथम, म.रा. सभा, पुणे |

❖ डॉ. छाया महाजन यांच्या मातोश्री राज्यास्तरीय अहिल्याबाई होळकर पुरस्कार प्राप्त स्व. सिंधूताई भालेराव (छत्रपती संभाजीनगर), आजोबा स्व. शंकरराव खांदाट रा. पिराजी पिंपळवाडी, ता. पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, व सासरे स्व. वैद्यभूषण तात्यासाहेब महाजन ता. पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, हे तिघेही हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिक आहेत.

**भूषविलेली पदे :**

* अधिव्याख्याता (इंग्रजी) देवगिरी महविद्यालय, औरंगाबाद (१९८४-१९९०)
* औरंगाबाद खंडपीठाच्या लोक न्यायालयामध्ये सन २००० पासून पॅनल ऑफ जजेस्‌मध्ये जज.
* बनारस विश्वहिंदु विद्यापीठ वाराणसी येथे (मेंबर ऑफ कोर्ट) विधि सभा सदस्य -२००८ पासून.
* बनारस विश्व हिंदु विद्यापीठात राष्ट्रीय पातळीवरील अनुवाद या विषयावर झालेल्या चर्चासत्राचे अध्यक्षपद (१४, १५ नोव्हेंबर २०१०)
* अलीगढ मुस्लिम विद्यापीठ, अलीगड येथे प्रमुख अतिथी आणि स्त्रियांच्या विद्यालयात 'एम्पावरमेंट ऑफ विमेन' या विषयावर मुख्य भाषण.
* प्रपाठक व विभागप्रमुख (इंग्रजी), डॉ. आय.बी.पी. महिला कॉलेज, औरंगाबाद.
* प्रपाठक, पदव्युत्तर विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
* पीएच्.डी. मार्गदर्शक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
* माजी प्राचार्या, डॉ. आय.बी.पी. महिला महाविद्यालय, औरंगाबाद (२००६ ते २००९)
* डायरेक्टर, साधुबेला एज्युकेशन सोसायटी, कल्याण, मुंबई २००९ पासून.
* माजी प्राचार्या, शिवशक्ती कॉम्प्युटर सायन्स कॉलेज, वाशी, उस्मानाबाद (२०१०)
* प्राचार्या : ए.बी. कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स, खुलताबाद २०११.
* अध्यक्षा - मराठवाडा लेखिका संमेलन १७,१८ जानेवारी, २०१५ जालना

**इतर संस्थांमध्ये भूषविलेली पदे :**

* कार्यकारिणी सदस्य, शिशुविहार शिशु विकास हायस्कूल, औरंगाबाद. (१९९२ ते २००३)
* कार्यकारिणी सदस्य, जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगाव, जि. अहमदनगर. १९९० पासून
* कार्यकारिणी सदस्य, पवार इंग्लिश स्कूल, औरंगाबाद. २००९-२०१०.
* कार्यकारिणी सदस्य स्टेपिंग स्टोन हायस्कूल, हर्सूल औरंगाबाद. (२००८ ते २०११ पर्यंत)
* सदस्य नॅक कमिटी २००२-२००३
* मार्गदर्शक सदस्य : आकाशवाणी औरंगाबाद केंद्र २०१० पासून
* विश्वस्त सल्लागार : इंद्राज कॉलेज ऑफ आर्टस्‌ ॲण्ड कॉमर्स, सिल्लोड, जि. औरंगाबाद
* विश्वस्त सल्लागार : साधुबेला एज्यूकेशनल इन्स्टिट्यूट, कल्याण, ठाणे

# पुरस्कार

* 'नकळत' या लघुतम कथासंग्रहासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य, मुंबई तर्फे उत्कृष्ट लेखन पुरस्कार – १९९२.









* स्वामी रामानंद तीर्थ गौरव सन्मान पुरस्कार (साहित्य) – सप्टेंबर २००३.







* 'मराठवाडा भूषण' पुरस्कार (सामाजिक, शैक्षणिक साहित्यासाठी) – सप्टेंबर २००४.






* विनायकराव चारठाणकर पुरस्कार – नोव्हेंबर २००४.






# पुरस्कार

* महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे वि.स. खांडेकर पुरस्कार – कांदबरी – 'कॉलेज' २००७.










* अंकुर वाङ्मय पुरस्कार (२००९) 'मानसी' या कादंबरीसाठी







* प्रा. उमांकात कीर पुरस्कृत कृष्णाजी वामन कीर पुरस्कार, श्रेष्ठता पारितोषिक, म.सा. पुणे, पाण्यावरचे दिवे (ललितगद्य) २०१२.



















* पुणे मराठी ग्रंथालयातर्फे दिला जाणारा 'राजेंद्र बनहट्टी पुरस्कार' – 'राहिलो उपकारा इतुका' या कथासंग्रहास – १८ जानेवारी २०१४

* मराठी वाङ्मय परिषद, बडोदा अभिरुचि गौरव पुरस्कार – 'राहिलो उपकारापुरता' या कथासंग्रहास जून २०१४.

# पुरस्कार





❖ सन्मान कृतज्ञता स्नेहालय, अहमदनगर – २०१६




❖ सूर्योदय सर्वसमावेशक मंडळ, जळगाव यांचा 'सौ. लिलाबाई दलिचंद जैन सूर्योदय बाल साहित्य पुरस्कार' – ८ मार्च २०२०




❖ 'होरपळ' या कादंबरीसाठी 'वसंतराव दांदळे स्मृती पुरस्कार' – २२ जानेवारी २०१७












❖ वाङ्मय चर्चा मंडळ, बेळगाव (कर्नाटक) यांचा 'ललितगद्य पुरस्कार', 'गगन जीवन तेजोमय' या पुस्तकास – २०१८

❖ महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे यांचा 'महाकवी कालिदास प्रज्ञावंत लेखक पुरस्कार' – जुलै २०२२










❖ साहित्य विहार, नागपूर तर्फे 'सर्वोत्कृष्ट लेखिका पुरस्कार' ललित लेखनासाठा 'चंद्राचे तुकडे' या ललितगद्य संग्रहाला – २१ ऑक्टोबर, २०२३

❖ मराठी साहित्य मंडळ, ठाणे तर्फे 'राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार' 'चंद्राचे तुकडे' या ललितगद्यला – २०२२

# पुरस्कार




❖ महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे यांचा 'महाकवी कालिदास प्रज्ञावंत लेखक पुरस्कार' – जुलै २०२२







❖ 'लायन्स द्रोणाचार्य ॲवार्ड', लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद (मेट्रो) शैक्षणिक कार्यासाठी – १६ सप्टेंबर २०२२




❖ स्व. सौ. कांताबाई भवरलाल जैन 'सेवारत्न' पुरस्कार द्वारा सर्वोदय सर्व समावेशक मंडळ, जळगाव – २७ नोव्हेंबर २०२२







❖ महाकवी कालिदास प्रतिष्ठान, पुणे यांचा 'महाकवी कालिदास लक्षवेधी पुरस्कार' – १९ जून २०२३

## शैक्षणिक कार्यातील सहभाग :

* अनेक शैक्षणिक उपक्रमांमध्ये विषयतज्ज्ञ म्हणून व विविध कार्यकारिणी सदस्य, परीक्षक या नात्याने सहभाग.
* विविध विषयांवरील व इंग्रजी विषयातील १० चर्चासत्रांचे आयोजन.
* **राष्ट्रीय व राज्य पातळीवरील ३६ इंग्रजी विषयावरील चर्चासत्रे व परिषदा, कार्यशाळा यामध्ये सहभाग आणि शोधनिबंध वाचन.**
* **आंतरराष्ट्रीय पातळीवरील 'युनेस्कोने' आयोजित केलेल्या परिषदेत सहभाग ( २०१० - नवी दिल्ली )**
* **बीजिंग- चीन येथील परिषदेसाठी शोधनिबंध ( १९९९ ).**
* अनेक स्त्रीविषयक चर्चासत्रांत मराठी परिसंवादात सहभाग, इंग्रजी विषयातील चर्चासत्रातील सहभाग. त्यातील काही राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय महिलांविषयी चर्चासत्रे :

१) महिला व युवती सबलीकरण – १० डिसेंबर १९९५, पुणे.
२) महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा – २८ व २९ नोव्हेंबर, पुणे.
३) स्त्री अभ्यासासमोरील आव्हाने – ३० मे ते २ जून १९९८ पुणे.
४) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रीचा दर्जा व प्रतिमा – ११ व १२ नोव्हेंबर १९९८.
५) हुंडा निर्मूलन – १५ मार्च १९९९ औरंगाबाद.
६) पारधी स्त्रियांचे प्रश्न – १८ मार्च १९९९ इंडियन सोशल काँग्रेस, गांधी ग्राम, आंध्रप्रदेश.
७) 'स्त्री धर्म महात्मा फुले प्रतिष्ठा' डॉ. बा.आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १६ मार्च १९९९.
८) स्त्री आत्मचरित्राचा अभ्यास : बेजिंग विद्यापीठ – २१ ते २४ जून १९९९, चीन.
९) राष्ट्रीय एकात्मता व जातीय सलोखा यात २३ व २४ सप्टेंबर २०००. चर्चासत्राचे व्यवस्थापन व संयोजन सक्रिय सहभाग, औरंगाबाद पीरा असोसिएशन, औरंगाबाद.
१०) महिला धोरण चर्चासत्रात सहभाग – १९९५.
११) स्त्री धर्म १५ व १६ मार्च महात्मा फुले प्रतिष्ठान : डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
१२) बदलत्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा वाङमयावर परिणाम – २ व ३ मार्च २०००.
१३) नव्या सहस्रकातील कॉमर्स शिक्षणापुढील आव्हाने – २९ व ३० नोव्हेंबर २००२.

## सक्रिय सहभाग :

१) महात्मा गांधी निधी औरंगाबाद या संस्थेतर्फे प्रौढ साक्षर वर्गासाठी संघटक व मार्गदर्शक (१९८०–८१)
२) भगिनी निवेदिता प्रतिष्ठान सांगलीच्या औरंगाबाद विभागाची सेक्रेटरी ३० प्रौढ शिक्षण वर्ग (महिलांसाठी) वर्ग व ३० पाळणाघरे ग्रामीण भागात चालविली. (१९८१–८४)
३) रोटरी क्लब इनरव्हिलची सेक्रेटरी (१९८१ ते ८४)
४) जनजागरण महिला समिती औरंगाबादतर्फे प्रौढशिक्षणवर्ग आयोजक व मार्गदर्शक (१९८४ ते ९०)
५) प्रौढ नवसाक्षर शिबिरात सक्रिय सहभाग व पदाधिकारी (१९८१–८४)
६) साक्षरता प्रबोधन वर्गाचे आयोजन (१९९१ ते ९४)
७) शिशुविकास शाळेसाठी प्रबोधन वर्गाचे आयोजन (१९९१ ते ९४)
८) नवसाक्षरोत्तर व निरंतर शिक्षण विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ सदस्य (७ ते १२ ऑक्टोबर १९९२)
९) प्रौढ साक्षर पुस्तक निवड समिती सदस्य (फेब्रुवारी १९९३)
११) परीक्षक – महाराष्ट्र राज्य प्रौढसाक्षर साधन केंद्रातर्फे नवसाक्षर लेखक पुरस्कार
१२) महिला धोरण परिषदेत सहभाग (१९९५)
१३) विद्यार्थ्यांसाठी प्रौढ साक्षरता व निरंतर शिक्षण लेखन कार्यशाळेचे आयोजन (१९९६).
१४) चर्चासत्रात सहभाग 'ॲडल्ट ॲण्ड कन्टिन्यूइंग एज्युकेशन ॲण्ड एक्सटेंशन सेंटर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा युनिर्व्हसिटी' (२२–२३ जानेवारी १९९७)

१५) सहभाग – प्रौढसाक्षर व निरंतर शिक्षण लेखन परिषद (१० ते १२ एप्रिल १९९७)
१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे प्रकाशित होणाऱ्या नवसाक्षरांसाठी 'सूर्योदय' या वार्षिक अंकाचे संपादन (१९९७).
१७) हुंडा निर्मूलन चळवळतर्फे चर्चासत्रात सहभाग (३ डिसेंबर २००२).
१८) 'लोकशिक्षण' या स्त्रीविषयक अंकात प्रौढसाक्षरांसाठी लेख (जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २००२).
१९) अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्यावर व्याख्याने – सरस्वती भुवन आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, औरंगाबाद (१ ऑगस्ट २००४), शारदा मंदिर, औरंगाबाद (७ सप्टेंबर २००४). शिशुविकास विकास केंद्र, औरंगाबाद (१७ सप्टेंबर २००४), बळीराम पाटील हायस्कूल, औरंगाबाद (१० ऑक्टोबर २००४), देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद (२ जानेवारी २००४.)
२०) प्रौढसाक्षरता केंद्र, महाराष्ट्र राज्य व आकाशवाणीतर्फे आयोजित लेखक कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून सहभाग (२००६).
२१) मराठवाडा सांस्कृतिक मंडळ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवात परीक्षक म्हणून सहभाग (१९८७–८८)
२२) महाराष्ट्र बँकेतर्फे आयोजित व्याख्यान – स्त्री शक्ति (१८ मार्च २००६).

याशिवाय अनेक व्याख्याने, परिषद, चर्चासत्रे आणि कार्यशाळेत सहभाग.

## इतर प्रकाशनामधील समावेश :

* 'साद' प्रकाशक म.सा.प. अहमदनगर या काव्यसंग्रहात कविता (१९८३).
* 'मराठवाड्याची कथा' साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद यामध्ये कथा – १९९५.
* डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. द्वितीय शैक्षणिक पुस्तकात कथा समाविष्ट – २००२.
* उच्च माध्यमिक शालेय अभ्यासक्रमांत ललित गद्य 'मोरंबागडी'.
* पहिले पुस्तक – साकेत प्रकाशन, औरंगाबाद – लेखक रमेश राऊत – २००३.
* 'रानगंधाचे गारूड' – साकेत प्रकाशन, औरंगाबाद – सं. प्रकाश होळकर – २००८
* मराठवाड्याची विनोदी कथा – संपादन – एकनाथ आबूज – कल्पना, बीड – २०१०.
* मराठवाड्यातील कथालेखिका – संपादक एकनाथ आबुज, वसंत गायकवाड, कल्पना, बीड – २०१०.
* स्त्री सशक्तीकरण – संपादन – डॉ. राजकुमारी गडकर, भारतीय साहित्य – २०१०.
* शोध निबंध – अनुवाद मिमांसा – संपा. – डॉ. केशव तुपे, साक्षात, औरंगाबाद – २०१२.
* मराठवाड्यातील लेखिकांच्या भाषांतरित महिलाकृती – संपा. डॉ. मीनाक्षी निमकर देव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, ऑक्टोबर २०१३.
* लेख : संकल्पना व स्वरूप, परिवर्तनवादी साहित्य, संपादक : डॉ. रामकिशन दहिफळे, औरंगाबाद – २०२१
* लेख : स्त्री वाद (काल आणि आज), संपादक : डॉ. प्रतिभा जाधव, अमरावती – २०२२
* कथा : कथार्थ (निवडक कथा), सं. मराठी अभ्यास मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद – २०२२

## आजीव सदस्य :

* महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.
* मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.
* इंडियन असोसिएशन ऑफ विमेन्स स्टडीज, मुंबई.
* महाराष्ट्र असोसिएशन ऑफ विमेन्स, पुणे.
* औरंगाबाद पीस असोसिएशन, औरंगाबाद.
* इंडियन नॅशनल टुरिझम ॲण्ड हेरिटेज रिझर्व्हेशन (इंटॅक) औरंगाबाद.

# एकूण ग्रंथ संपदा - ४२

## कथा संग्रह :

| नाव | प्रथमावृत्ती | प्रकाशन | |
|---|---|---|---|
| मुलखावेगळा | १९८५ | मेहता पब्लिकेशन, पुणे | ४ थी आवृत्ती २०१६ |
| यशोदा | १९९१ | मेहता पब्लिकेशन, पुणे | ६ वी आवृत्ती २०१६ |
| नकळत | १९९२ | साहित्य सेवा, औरंगाबाद. | उत्कृष्ट लेखन पुरस्कार - १९९२. |
| ओढ | १९९७ | साहित्य सेवा, औरंगाबाद. | |
| एकदश कथा | २००० | मेहता पब्लिकेशन, पुणे | ४ थी आवृत्ती २०१६ |
| राहिलो उपकारा इतुका | २०१३ | पद्मगंधा, पुणे | राजेंद्र बनहट्टी पुरस्कार - २०१४.<br>अभिरुची गौरव पुरस्कार- बडोदा, गुजरात |
| अज्ञात | २०२० | मेहता पब्लिकेशन, पुणे | |

## ललितगद्य :

| | | | |
|---|---|---|---|
| मोरबांगडी | १९९३ | साहित्यसेवा, औरंगाबाद | |
| पाण्यावरचे दिवे | २०११ | जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद | कृष्णाजी वामन कीर पुरस्कार २०१२ |
| दशदिशा | २०१५ | रजत प्रकाशन, औरंगाबाद. | |
| गगन जीवन तेजोमय | २०१८ | विश्वकर्मा प्रकाशन, पुणे | |
| कोलावरी डी | २०१९ | संस्कृती प्रकाशन, पुणे | |
| चंद्राचे तुकडे | २०२२ | उत्कर्ष प्रकाशन, पुणे | 'सावित्रीबाई फुले साहित्य भूषण पुरस्कार' |

## कादंबरी :

| | | | |
|---|---|---|---|
| कॉलेज | २००६,२००८, २०१५ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | वि.स. खांडेकर पुरस्कार - २००७. |
| मानसी | २००८,२०१५ | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | अंकुर वाङ्मय पुरस्कार - २००९ |
| तन अंधारे | २००९ | पद्मगंधा, पुणे | |
| होरपळ | २०१५ | साकेत प्रकाशन, औरंगाबाद. | वसंतराव दांदळे स्मृती पुरस्कार - २०१६ |
| डोईचा पदर खांद्यावरी | २०२३ | राजहंस प्रकाशन, पुणे | |

## बालवाङ्मय :

| | | |
|---|---|---|
| इवलेसे रोप | १९८३ | महाराष्ट्र राज्य साधना केंद्र, औरंगाबाद. |
| भोवरा | १९८९ | महाराष्ट्र राज्य साधना केंद्र, औरंगाबाद. |
| फुलाच्या गोष्टी | १९९५ | परिमल, औरंगाबाद |
| रक्ताच रंग एक | १९९४ | साहित्य सेवा औरंगाबाद. |
| विजय आमचाच होईल | २०१८ | प्रकाशन विभाग,भारत सरकार, दिल्ली (बाल कादंबरी) |

## चरित्र :

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील | २००८ | रोहन प्रकाशन, पुणे |
| ए.पी.जे. अब्दूल कलाम | २०२२ | साकेत प्रकाशन, औरंगाबाद. |

## भाषांतरे :

मुलांचे प्रेमचंद (लेखक - मुन्शी प्रेमचंद) तीन पुस्तके - १९९६, साहित्य सेवा, औरंगाबाद.
निळ्या डोळ्यांचा माणूस (लेखक - गि.द. मोपासा) १९९७, साहित्य सेवा, औरंगाबाद.
हरझॉग (नोबेल पारितोषिक विजेती कादंबरी, लेखक - सॉलबेलो) २०००, साहित्य सेवा, औरंगाबाद.
भारताची लूट आणि बदनामी : १९ व्या शतकातील ब्रिटीश जिहाद (लेखक - धर्मपाल) २०१३ - भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ, दिल्ली
रविंद्रनाथ टागोर यांच्या नाटिका - २०१५-१६ - साहित्य अकादमी, मुंबई.
आजीची वाणी - स्वच्छ जंगलाची कहाणी - ४ पुस्तकांचा संच - २०१७ - केंद्रीय प्रसारण मंत्रालय, दिल्ली.
स्मारक शिळा (लेखक - पुनत्तील कुन्हअब्दुल्ला) २०१९ - साहित्य अकादमी, मुंबई.

## इंग्रजी पुस्तके :

विमेन इन पॉल स्कॉटस नॉव्हेल्स - १९९७ (अल्ट्रा पब्लिकेशन, बंगलोर)
इन्सपायरिंग जर्नी (श्रीमती प्रतिभा देवसिंह पाटील) इंग्रजी २०१०- एस चाँद अँण्ड कंपनी न्यू दिल्ली.

## हिंदी भाषांतरे :

१) मानसी - २०१५, विकास प्रकाशन, कानपूर
२) तन अंधारे - २०१६, विकास प्रकाशन, कानपूर
३) कॉलेज - २०२३, विकास प्रकाशन, कानपूर

## डिजीटल पुस्तके : (on daily hunt / Amazon)

**कादंबरी -** १) कॉलेज २) मानसी ३) तन अंधारे

**कथा -** १) कालातीत

**कथा संग्रह -** १) मुलखावेगळा २) यशोदा ३) एकादश कथा ४) राहिलो उपकाराइतुका ५) नकळत

**SahityaChhaya** या यू ट्यूब चॅनल वर १०० पेक्षा जास्त व्हिडिओ.

## वाङ्मयीन कार्य :

१) परीक्षक – उद्योजक कादंबरी पुरस्कार, एमसीईडी, १९९६
२) परीक्षक – उद्योजक साहित्य पुरस्कार, एमसीईडी, १९९६
३) परीक्षक – प्रौढसाक्षरता कादंबरी लेखन पुरस्कार
४) संपादन – पसायदान द्वैमासिक, औरंगाबाद.
५) संपादन – ज्येष्ठा गौरी, औरंगाबाद (मासिक)
६) संपादन – श्रावणसरी, औरंगाबाद (दिवाळी अंक)
७) संपादक मंडळ सदस्य – सत्याग्रही विचारधारा (मासिक) २००४ पासून
८) परीक्षक – कादंबरी – महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, मुंबई – २००१.
९) अनुवाद केंद्र पुणेसाठी कार्यरत.
१०) व्याख्यान – दहावी मराठी प्रकाशक परिषद, औरंगाबाद – २००२.
११) व्याख्यान – दहावे परभणी जिल्हा साहित्य संमेलन – १२ मे २००२,
१२) व्याख्यान – २३ वे मराठवाडा साहित्य संमेलन २ जून २००२.
१३) मुलाखत – डॉ. आनंद पाटील– गोवा दूरदर्शन पणजी, २००२.
१४) परीक्षक : कादंबरी –महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, ऑगस्ट २००२.
१५) व्याख्यान – विजया राजाध्यक्ष यांची साहित्य समीक्षा – मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद.
१६) मुलाखत – डॉ. अनिल अवचट प्रतिभा संगम साहित्य संमेलन, औरंगाबाद, २००४.
१७) परिसंवाद ७७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, औरंगाबाद, २००४.
१८) अंर्तनाद, पुणेतर्फे औरंगाबाद येथे परिसंवाद, २८ डिसेंबर २००३.
१९) परीक्षक – कादंबरी – महाराष्ट्र राज्य प्रौढसाक्षर शिक्षण केंद्र, औरंगाबाद.
२०) परीक्षक – बालवाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक महामंडळ, मुंबई.
२१) परिसंवाद – राष्ट्रीय मराठी बालसाहित्य संमेलन, परभणी – २००६.
२२) आमंत्रित – मराठी कता लेखिता संमेलन – कुसुमांजली, औरंगाबाद, २००७.
२३) आमंत्रित – २८ वे मराठवाडा साहित्य संमेलन – उस्मानाबाद – २००७.
२४) आमंत्रित – २९ वे मराठवाडा साहित्य संमेलन – उंडणगाव (औरंगाबाद) – २००८.
२५) व्याख्यान – साहित्योत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ – २००८.
२६) व्याख्यान – स्त्री कला साहित्योत्सव – नाट्यशास्त्र विभाग, औरंगाबाद – २००९.
२७) व्याख्यान – महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ – २००८.
२८) समन्वयक – भारतीय शिक्षण मंडळ, मुंबईतर्फे आयोजित 'स्त्री समस्या आणि उपाय' विषयावरील परिषद, औ'बाद – २००८.
२९) व्याख्यान – ३० वे मराठवाडा साहित्य संमेलन – नायगाव (नांदेड)
३०) व्याख्यान – स्त्री लेखिकांवरील परिषद – यू.जी. वाचनालय – २००९.
३१) साहित्य अकादमी दिल्लीतर्फे आयोजित उत्तरपूर्व व पश्चिम भारतासाठी लेखक संमेलन, पुणे – ऑक्टोबर २००८.
३२) प्रमुख पाहुणे, व्याख्याता : भाषांतर, वाराणसी विश्वविद्यालय, वाराणसी – १४ नोव्हेंबर २०१०.
३३) साहित्य अकादमी दिल्लीतर्फे आयोजित लेखक संमेलन – कोची (केरळ) – २७ नोव्हेंबर २०१०.
३४) स्त्री सक्षमीकरण, अलिगढ मुस्लिम युनिव्हर्सिटी, अलिगढ – २९ नोव्हेंबर २०१०.
३५) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, ठाणे – परिसंवाद सहभाग – ५ डिसेंबर २०१०
३६) अध्यक्ष परिसंवाद – महिला मराठवाडा साहित्य संमेलन अंबाजोगाई – २०१०.

## वाङ्मयीन कार्य :

३७) सहभाग – अक्षर मानव साहित्य संमेलन – पाचगणी (महाबळेश्वर) – २७ ते २९ जुलै २०१२,
३८) लेखक संमेलन (सन २००० नंतरचे कादंबरीकार), शंकर सारडा अमृत महोत्सव, सातारा –२५–२६ ऑगस्ट २०१२.
३९) साहित्य प्रकल्प – सहसंपादन – एनसायक्लोपेडिया ऑफ इंडियन लिटरेचर – भाग – ३ (ऑक्टोबर २०११ पासून) साहित्य अकादमी, दिल्ली.
४०) भाषण – 'मराठी भाषा व वाङ्मयीन साहित्य लेखनापुढील आव्हाने' – महाराष्ट्र सा.प. चाळीसगाव – २५ फेब्रुवारी २०१५
४१) झेंडावंदन – अनंतराव भालेराव विद्यालय, औरंगाबाद – १५ ऑगस्ट २०१५
४२) भाषण – विश्वब्राह्मण सेवाभावी संस्था, औरंगाबाद – गुरुपौर्णिमा २०१५
४३) भाषण – वाचन संस्कृती – नामचिंतन उपासना मंडळ, औरंगाबाद
४४) भाषण – लघुतम कथा – अक्षरसूक्त, औरंगाबाद
४५) भाषण – माझा लेखन प्रवास – बंकट कॉलेज, बीड – ३० जानेवारी २०१६
४६) Chair Person - Story Session, All India Writer's Meet, Sahitya Academi, Mumbai - 19th May 2016
४७) भाषण – रिफ्रेशर्स कोर्स – शिवाजी युनिव्हर्सिटी, मराठी विभाग, कोल्हापूर – ५ ऑक्टोबर २०१६
४८) भाषण – माझ्या लेखन प्रेरणा – अक्षर मैत्री संमेलन, महाराष्ट्र सेवा संघ, महिला विभाग – १५, १६ ऑक्टो. २०१६
४९) वक्ता – स्त्री सक्षमीकरण – वल्लभभाई पटेल जयंती निमित्त – गुजराथी महिला मंडळ, औरंगाबाद – २ नोव्हें. २०१६
५०) प्रमुख पाहुण्या – दीपत्कार (दिवाळी अंक) 'स्त्रिया' दैनिक वर्तमानपत्र, अर्चना डावरे, प्रकाश जोशी (संपा.) प्रतिभा पालोदकर,
५१) 'सखी पुरस्कार' हस्ते – सखी पुरस्कार, लोकमत, औरंगाबाद तर्फे – २० नोव्हेंबर २०१६
५२) पुस्तक प्रकाशन – ओंजळीतला सूर्य – ले. गो.द. पहिनकर, सोबत इंद्रजीत भालेराव, आसाराम लोमटे, साकेत प्रकाशन परभणी – ४ डिसेंबर २०१६
५३) अध्यक्ष – स्नेहसंमेलन, बक्षीस समारंभ – स.भु. प्रशाला हायस्कूल, औरंगाबाद – ७ डिसेंबर २०१६
५४) साहित्य संमेलन इंदोर – १६,१७,१८ डिसेंबर २०१६
५५) प्रमुख पाहुणे व बक्षीस समारंभ – सावित्रीबाई फुले जयंती – स्वा.सै. सिंधुताई भालेराव स्मृती कथा वाचन स्पर्धा, औरंगाबाद – ३ जानेवारी २०१७
५६) पारितोषिक वितरण – 'नव काखन' डॉ. भीमराव वाघचौरे, शिवार पारितोषिक (रा. रं. बोराडे), औरंगाबाद. ७ जाने. २०१७
५७) प्रमुख पाहुणे – स्नेहसंमेलन – रिमांड होम, अहमदनगर – २८ जानेवारी २०१७
५८) वक्ता – मराठी भाषा – स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडा – पारितोषिक वितरण हस्ते – २४ जानेवारी २०१७
५९) भाषण – ध्वजवंदन – अ.कृ. वाघमारे विद्यालय, औरंगाबाद ( १ ली ते १० वी) – २६ जानेवारी २०१७
६०) उद्घाटक – देवमुद्रा ट्रस्ट, औरंगाबाद. सौभाग्य प्रतिभा – अखिल भारतीय शास्त्रीय नृत्य स्पर्धा – उद्घाटन, बक्षीस समारंभ १० फेब्रुवारी २०१७
६१) स्नेहसंमेलन पाहुणे – लिटिल एंजल स्कूल, सी.बी.एस.ई., औरंगाबाद – ११ फेब्रुवारी २०१७
६२) भाषण – 'मराठी भाषा : अनुवाद' – डॉ. बा.आं.म.वि. मराठी विभाग, औरंगाबाद – २२ फेब्रुवारी २०१७
६३) स्नेहसंमेलन प्रमुख पाहुणे – पोद्दार इंटरनॅशनल, हर्सूल टी पॉइंट, औरंगाबाद – २५ फेब्रुवारी २०१७
६४) Literacy Festival - South & North East Region - Sahitya Academi, Delhi - 'Purvastav' Literacy Festival Session : Writing - Inspiration or Profession Participation - 21,22,23 April 2017
६५) सत्कार हस्ते – अपर्णा गोडबोले, अर्चना मोरे, नाटक – 'जनक' ले. शार्दुल सराफ, कलारंग संस्था, औरंगाबाद –४ जून २०१७
६६) कथा वाचन व भाषण – शंकर वाचनालय,भारत गुणवर्धन संस्था साहित्य मंडळ, हैदराबाद – २२ जुलै २०१७
६७) कथा अभिवाचन व भाषण – महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे – ११ ऑगस्ट २०१७
६८) 'वाचन प्रेरणा दिन' समता दर्शन, औरंगाबाद – १६ ऑक्टोबर, २०१७
६९) देवगिरी हायस्कूल, औरंगाबाद, 'डॉ. अब्दूल कलाम जन्मदिन' – १८ नोव्हेंबर, २०१७
७०) बालभारती, पुणे अभ्यासक्रम इंग्रजी – ५/६ नोव्हेंबर, २०१७
७१) श्रीसमर्थ माध्यमिक विद्यालय, अहमदनगर, विद्यार्थी, शिक्षक व पालक – ९ डिसेंबर, २०१७
७२) देवमुद्रा मुन्हमेंट इन्स्टीट्यूट, औरंगाबाद – १० डिसेंबर, २०१७

## वाङ्‌मयीन कार्य :

७३. पुस्तक विमोचन, औरंगाबाद, लेखिका : डॉ. जयश्री गोडसे – १६ डिसेंबर, २०१७

७४. पुस्तक प्रकाशन, औरंगाबाद, लेखक : सत्यजित खारकर – २३ डिसेंबर, २०१७

७५. बाल कुमार महोत्सव, जालना – २४/२५ डिसेंबर, २०१७

७६. हिरक महोत्सव, समना दर्शन संस्था, औरंगाबाद – २१ जानेवारी, २०१८

७७. केशवराज शिक्षण प्रसारक मंडळ, सेलू, युवकांचे सामाजिक उत्तरदायित्व – २४ जानेवारी, २०१८

७८. पुस्तक प्रकाशन, औरंगाबाद, लेखक : हरि ससे – १३ फेब्रुवारी, २०१८

७९. अखिल भारतीय साहित्य संमेलन, बडोदा – १६/१७ फेब्रुवारी, २०१८

८०. मराठी ग्रंथ संग्रहालय, नेउरमेर, हैद्राबाद – २६ फेब्रुवारी, २०१८

८१. अनुभव कथन, औरंगाबाद – ९ मार्च, २०१८

८२. जागतिक महिला दिन कण्व ब्राह्मण समाज (सक्षमीकरण), औरंगाबाद – ११ मार्च, २०१८

८३. ब्राह्मण महासंघ, औरंगाबाद : अक्षरसूक्त – १७ मार्च, २०१८

८४. नाद फाउंडेशन, दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र, नागपुर, सन्मान – १७ मार्च, २०१८

८५. उद्घाटक : माजलगाव–मंजीरथं, शिवार साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य परिषद, शाखा माजलगाव – २२ एप्रिल २०१८

८६. महिला सक्षमीकरण व उच्च शिक्षणाचे महत्त्व – कै. कु. दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालय, लोणार, जि. बुलडाणा – २० जुलै, २०१८

८७. कथावाचन, मुलाखत : व्यंकटेश कुलकर्णी, साहित्यिक कट्टा, हैद्राबाद (कुकटखल्ली) – ३० सप्टेंबर, २०१८

८८. कथावाचन, मुलाखत : अपर्णा आहेर, सुयोग कॉलनी दुर्गा मंडळ, औरंगाबाद – १२ ऑक्टोंबर, २०१८

८९. वाचन प्रेरणा दिन (डॉ. अब्दुल कलाम जन्मदिवस), सरस्वती भुवन प्रशाला, बिडकन, औरंगाबाद – १६ ऑक्टोंबर, २०१८ (सकाळी ८.०० वा.)

९०. पुस्तक प्रकाशन, साकेत प्रकाशान, औरंगाबाद – १६ ऑक्टोंबर, २०१८ (सायंकाळी ७.०० वा.)

९१. मुलाखत : मिलिंद कुलकर्णी (मी व उमा कुलकर्णी), दिव्यमराठी – Literary Festival - २३ नोव्हेंबर, २०१८

९२. कथाकथन (वाघ, कळमकर सह), साहित्यिक कलावंत साहित्य संमेलन, पुणे – यशवंतराव चव्हाण नाट्यगृह – २३ डिसेंबर, २०१८

९३. लेखन कार्यशाळा (२ तास) (निकीता भागवत), प्रतिष्ठान कॉलेज, पैठण व महा. शासन – ७ जानेवारी, २०१९.

९४. लेखन कार्यशाळा (गद्य लेखन), अंबड व महा. शासन – १५ जानेवारी, २०१९.

९५. वाङ्‌मय मंडळ उद्घाटन : महिल कॉलेज, औरंगाबाद – १७ जानेवारी, २०१९.

९६. पुस्तक प्रकाशन (हस्ते मी) : वृषाली श्रीकांत – 'जावे 'ती'च्या वंशा', औरंगाबाद – २७ जानेवारी, २०१९.

९७. स्त्री : काल, आज व उद्या, स्त्रीया व अध्यात्म – वनिता विकास मंडळ, गुलबर्गा, ७० वा वाढदिवस – ३ फेब्रुवारी, २०१९.

९८. प्रमुख अतिथी : वार्षिक स्नेहसंमेलन, पद्मश्री शंकर बापू आपेगावकर इंग्लिश स्कूल, औरंगाबाद – १८ ऑक्टोबर, २०१९.

९९. सु.द. घाटे यांना माझ्या हस्ते 'जीवन विकास वाचनालय श्रीमती सावित्रीबाई जोशी पुरस्कार', औरंगाबाद – ९ डिसेंबर, २०१९.

१००. 'मानव हक्क' दिना निमित्त सन्मान, महाराष्ट्र राज्य माहिला सन्मान मंच तर्फे, ममता जनकल्याण बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद – १० डिसेंबर, २०१९. (State Level Excellence Award)

१०१. प्रमुख अतिथी : वार्षिक स्नेहसंमेलन, GM संस्कार विद्यालय, वाळूज, औरंगाबाद – १९ डिसेंबर, २०१९

१०२. Resource person for Domestic violence & Media Issues & Challenges, Dr. IBP Mahila College, Aurangabad - 13 February 2020

१०३. मराठी भाषा पंधरवाडा दिना निमित्त : कथा अभिवाचन (कथा – डॉ. छाया महाजन) नाथरंग प्रस्तुत, योगेश इरतकर, मधुरा टापरे, सौख्यदा देशपांडे, प्राचार्य, डॉ. गणेश अग्निहोत्री : पं. जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद – १४ फेब्रुवारी, २०२०.

०४. व्याख्यान : साहित्य व मूल्ये, प्रमुख अतिथी व व्याख्याते, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फूलंब्री – १५ फेब्रुवारी, २०२०.

१०५. अध्यक्ष : एक दिवसीय साहित्य संमेलन समारोप, सूर्योदय सर्वसमावेशक मंडळ, जळगाव – ८ मार्च, २०२०

१०६. On Line : मुक्त सृजन, माझा लेखन प्रवास – २७ मे, २०२०

**वाङ्मयीन कार्य :**

१०७. मनसा क्रिएशन, प्रिया कलिका बापट, कविता गोवा – १५ जून, २०२०
१०८. On Line : सुंदर माझी शाळा, On Line शिक्षण व शाळा – २६ जून, २०२०
१०९. ई अक्षर शब्द त्रिवेणी, कविता, Voice of Mumbai कवितेच्या दूनियेत – १२ जुलै, २०२०
११०. Voice of Mumbai : चहा कथा इतर बरेच काही – १७ जुलै, २०२०
१११. इंद्रधनु ग्लोबल वेब कवी संमेलन, गोवा – २६ जुलै, २०२०.
११२. बाल साहित्यकार मुलाखत, आकाशवाणी, Air वैजयंती – २ ऑगस्ट, २०२०
११३. On Line Education : जागृती मंच – २४ सप्टेंबर, २०२०
११४. YouTube Channel सुरू – १ ऑक्टोबर, २०२०
११५. 'वेषधारी पंजाबी' रहस्यमय कादंबरी, सुभाजी सदाशिवराव महाले, प्रकाशन – गोवा मराठी आकादमी, पौर्णिमा कारेकर, विद्या प्रभुदेसाई, अनिल सामंत, ३१ ऑक्टोबर, २०२०
११६. 'उपक्रमशील शिक्षक' सन्मान, अ.भा.सा.प. देवगिरी प्रांत, उद्घाटन मा. मधुकरराव जाधव, प्रांतसंघ चालक, ५ सप्टें. २०२०
११७. प्रगती महिली मंडळ, सोनी, बबीता करवा, On Line Education – १ ऑक्टोबर, २०२०
११८. कथा: जानीव
११९. On Line प्रदीर्घ मुलखत, जनमंगल, लोकव्रत संस्था – ३० ऑगस्ट, २०२१
१२०. On Line ललीतगद्य व्याख्यान – ५ सप्टेंबर, २०२१
१२१. महिल साहित्य संमेलन, पणजी, गोवा, : माझी माय सरसोती, प्रमुख डॉ. छाया महाजन (कथा, कादंबरीकार) हस्ते उद्घाटन, कवी संमेलन अध्यक्ष – १३ नोव्हेंबर, २०२१
१२२. गोवा दूरदर्शन मुलाखत : मुलाखतकार – पौर्णिमा केरकर – १५ नोव्हेंबर, २०२१
१२३. डॉ. दशरथ परब यांचे घरी. आय.एम.बी. इंस्टिट्यूट मेनेजिस ब्रागांझा – अध्यक्ष – १५ नोव्हेंबर, २०२१
१२४. डॉ. पुंडलीक नाईक, माजी अध्यक्ष गोवा साहित्य अकादमी, गोवा – १५ नोव्हेंबर, २०२१
१२५. रजनी रायकर यांच घरी १० गोवन लेखिकांची भेट – १६ नोव्हेंबर, २०२१
१२६. सुधीर व प्रियदर्शनी तडकोडकर भेट–जेवण – १७ नोव्हेंबर, २०२१
१२७. आकाशवाणी औरंगाबाद (YouTube) 'अज्ञात' कथासंग्रहावर मुलाखत द्वारा नम्रता फलके – २८ नोव्हेंबर, २०२१
१२८. व्यंकटेश कुलकर्णी, पुस्तक प्रकाशन, हैद्राबाद – १८ डिसेंबर, २०२१
१२९. उद्घाटक : श्री विनायकराव पाटील राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा, देवगिरी कॉलेज, औरंगाबाद – २८ डिसेंबर, २०२१
१३०. 'चंद्रांचे तुकडे' प्रकाशन, पुणे. श्री मिलिंद जोशी, शाम भूर्के, सुधीर गाडगीळ – १३ फेब्रुवारी, २०२२
१३१. कवयित्री संमेलन, औरंगाबाद, आम्ही सिद्ध लेखिका व आ.भा. साहित्य परिषद, दवेगिरी प्रांत – २६ फेब्रुवारी, २०२२
१३२. 'सावित्रीबाई फुले भूषण पुरस्कार' मराठी साहित्य मंडळ, ठाणे तर्फे जयप्रकाश घुमटकर – २१ मे २०२२
१३३. अध्यक्ष : महाराष्ट्र मित्र तर्फे पुणे साहित्यिक मेळावा (WhatsApp Group) – २२ मे २०२२.
१३४. साहित्य संमेलन, १५ जून : काव्य वाचन, १६ जून : कथाकथन – सत्र अध्यक्ष – १५ व १६ जून, २०२२
१३५. सुहास क्षीरसागर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन, पुणे – मिलिंद जोशी – २० ऑगस्ट, २०२२
१३६. महाकवी कालीदास प्रज्ञावंत लेखक पुरस्कार, महाकवी कालीदास प्रतिष्ठाण, पुणे. एक दिवसीय साहित्य संमेलन, कवि संमेलनात सहभाग – ३१ जुलै, २०२२
१३७. On Line : मला भावलेली कविता, रोटरी क्लब – १० सप्टें, २०२२
१३८. मुक्त सृजन साहित्य संमेलन, पणजी, गोवा. 'मी आणि माझी कादंबरी'– सत्र अध्यक्ष, इन गोवा या टीव्ही चॅनलवर मुलाखत – ११, १२ सप्टेंबर, २०२२
१३९. अध्यक्ष : 'अनंत स्मृती' पुस्तक प्रकाशन. औरंगाबाद – ५ नोव्हेंबर, २०२२
१४०. On Line : 'चंद्राचे तुकडे' पुस्तक परिचय. शब्दांकित साहित्य मंच, लातूर. द्वारा प्राचार्य डॉ. श्रुती वडगबाळकर, सोलापूर, डॉ सतीश बडवे – ४ डिसेंबर, २०२२
१४१. मराठवाडा साहित्य संमेलन, घनसावंगी. 'नवलेखक समाज माध्यमात अडकला आहे का?' परिसंवाद अध्यक्ष – १० डिसेंबर, २०२२
१४२. Kreyen Kids Nursary, Aurangabad. Chiefguest for Annual Day - 30 December, 2022
१४३. सदाचार संवर्धन जेष्ठ नागरीक संस्था, औरंगाबाद, वर्धापन दिन बक्षीस समारंभ, अनंत आचार्य, अनिलचौधरी, गीता आचार्य – २१ जानेवारी, २०२३

## वाङ्मयीन कार्य :

१४४. 'एपीजे अब्दूल कलाम' पुस्तकाचे प्रकाशन, पुणे साकेत प्रकाशन, श्री. रघुनाथ माशेलकर, श्री. मिलिंद जोशी – ३० जानेवारी, २०२३

१४५. अध्यक्ष : सिंहगड रोड जेष्ठ नागरीक संघ, रौप्य महोत्सवी समारंभ, मोहना टिपणीस, आजीत टिपणीस – ५ फेब्रुवारी, २०२३

१४६. अध्यक्ष : देवमुद्रा मुव्हींग अॅडस्, औरंगाबाद, वार्षिक स्नेहसंमेलन – ११ फेब्रुवारी, २०२३

१४७. अंजिठा एलोरा आंतरराष्ट्रीय महोत्सव, पूर्वरंग उद्‌घाटन. विश्वनाथ दाशरथे, राहुल खरे (कन्नड), डॉ. महाजन, श्री. मानसिंग पवार – १८ फेब्रुवारी, २०२३

१४८. व्याख्यान : 'जागतिक भाषा दिन', स.भु. कला, वाणिज्य महाविद्यालय, औरंगाबाद – २७ फेब्रुवारी, २०२३

१४९. स्मार्ट सोल्यूशन्स, केअर मिनिस्ट्री : मधुरा अन्विकर – ८ मार्च, २०२३

## साहित्य संमेलनातील सहभाग, समारोप अध्यक्ष, इत्यादी

१. मराठवाडा साहित्य संमेलन, औरंगाबाद – १ व २ जून २००२

२. अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन १९ वे, परभणी – १०, ११ जानेवारी, २००६

३. राज्यव्यापी मराठी कथा-लेखिका संमेलन, औरंगाबाद – १५ व १६ डिसेंबर २००७

४. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ८४ वे, औरंगाबाद – २४, २५, २६, २७ डिसेंबर, २०१०

५. मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन, अंबेजोगाई – २५ व २६ फेब्रुवारी, २०१२

६. राज्यस्तरीय चर्चासत्र : (कादंबरी) ता. पाटोदा, जि. बीड – ३१ ऑक्टोबर व १ नोव्हेंबर, २०१२

७. मराठवाडा लेखिका साहित्य संमेलन ७ वे, उस्मानाबाद – ६, ७ व ८ फेब्रुवारी, २०१६

८. मराठवाडा साहित्य परिषद १० वी, शिवार, माजलगाव – २२ एप्रिल, २०१८


९. महिला मराठी साहित्य संमेलन, गोवा (माझी माय सरसोती) दि १३ नोव्हेंबर, २०२१

१०. मुक्त सृजन साहित्य समेलन १ ले, पणजी, गोवा – ११, १२ सप्टेंबर, २०२२

११. मराठवाडा साहित्य संमेलन ४२ वे, घनसावंगी, आष्टी, ता. परतुर, जि. जालना – १० व ११ डिसेंबर, २०२२

# प्रकाशित ग्रंथ संपदा



















































# प्रकाशित ग्रंथ संपदा


















मुलांचे प्रेमचंद – ३ भाग





















आजीची वाणी – भाग १ ते ४














## COMMENTS ON BOOKS




**नकळत –** नकळत मधील कथा हृदयस्पर्शी आहेत. या कथांमध्ये स्त्रीपुरुष संबंधाचे चित्रण करण्यात आलेले आहेत. मानवी मनाच्या गुंतागुंतीचा मागोवा घेण्याची प्रवृत्ती यात दिसून येते. अनंत काणेकर, जी ए कुलकर्णी यांच्यानंतर लघुत्तम कथेची धुरा वाहण्याचे सामर्थ्य छाया महाजन यांच्या लिखाणातून दिसते. – ***शांताबाई शेळके.***

लघुतमकथा प्रतिकात्मक कथा म्हणून ओळखली जाते. ही कथा टीकाकारांना नेहमीच चकविते. काव्य आणि गद्याच्या सीमेवरचा हा प्रकार आहे. छाया महाजन यांनी सहजतेने आणि समर्थपणे हा कथा प्रकार हाताळून आपले अनुभवविश्व वाचकांसमोर मोजक्या शब्दात परिणामकरित्या उभे केले आहे. – ***सुधीर रसाळ*** *(विमोचन प्रसंगी) १९ फेब्रुवारी १९९२*

या कथा संग्रहात सत्य-शिव आणि सौंदर्याचा शोध घेतला आहे. – ***अनंतराव कुलकर्णी*** *कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे (विमोचन प्रसंगी)*

त्यांच्या कथा प्रायोगिक स्वरुपाच्या असून जीवनातल्या एरवी निसटून जाणाऱ्या अनुभवांची मांडणी त्या अत्यंत थोडक्या शब्दात करतात. जगतांना दृष्ठी असेल तर प्रत्येकच क्षणात काही भावगर्भ शोधता येतो याचं प्रत्यंतर त्यांच्या अल्पाक्षरी कथातून येतं. त्यांचं कथाविश्व मानवी संबंधांचं भावस्पर्शी चित्रण करतं. व्यक्तीमनाच्या गाभ्याचा अचूक शोध घेणारी संवेदनशीलता त्यांना लाभलेली आहे. स्वाभाविकपणानं काव्यमय होणारी शैली नेमक्या शब्दात सघन अर्थ भरण्याची हातोटी आणि भावसंबंधांचं तरल चित्रण अशी त्यांच्या कथांची काही वैशिष्ठे सांगता येतील. कुठल्याही विचारसरणीच्या कुबड्या न घेता स्त्री मनाच्या नाजूक भावनांचे उत्कट शब्दांकन त्यांची कथा साधते. – ***रविंद्र किंबहुने,*** *समीक्षक, रेडीओ, औरंगाबाद*

लघुनिबंधापेक्षा लघुतम कथा जास्त भावल्या. अर्थात नीतळता, स्वच्छ व लेखनदृष्ठी मला मोलाची वाटली. गावच्या मातीपासून इंग्रजी डॉक्टरेट तुटलेली नाही हे लेखनातून जाणवते. हा स्पर्श मातीचा असल्याने लेखनात टवटवीतपणा आहे. – ***डॉ. आनंद पाटील,*** *गोवा, १०/१०/१९९६*

लेखिकेमध्ये एक तरल प्रतिभा आहे. आणि त्या प्रतिभेला मनोहर शब्दरूप देण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. नकळत कथासंग्रहातील प्रत्येक कथा हे आधुनिक जीवनावरील व्यथित करणारे भाष्य आहे. लेखिकेचे व्यक्तिमत्व प्रस्थापित सामाजिक मूल्यांनी घडलेले. ही मुल्य उध्वस्त होताहेत, नव्या मूल्यांची प्रतिष्ठापना दृष्ठीपथास येत नाही अशा धुसर संध्याकाळी लेखिकेने जे अनुभवले. त्यातील आशयाचा शोध घेत ती लिहीत आहे. – ***श्री नारायणराव लोहारकर,*** *सोलापूर दि.१०/४/१९९४(ज्येष्ठ स्वातंयसैनिक व साहित्याचे अभ्यासक)*

लघुतमकथा हा आकृतीबंध बराच कालावधीनंतर मराठीत लिहीला जातोय तोही अतिशय समर्पकतेने. छोट्या छोट्या कथाव्दारे व्यक्त झालेल्या आशयाचे सम्यक दर्शन होणे हाच वाचकाचा आनंद. छाया महाजन यांची शैली स्वदर्शनातून आलेल्या अनुभवांना वेगळा घाट देणारी आहे. – ***अरुण कुलकर्णी*** *(लेखक)*

खरे तर छाया महाजन यांनी मांडलेली समाज जीवनाची एक एक बाजू म्हणजे एक एक सामाजिक प्रश्नच आहे; पण तो व्यक्त होतांना आक्रस्ताळेपणा नाही. तीव्र उपहासातून किंवा सहजतेतूनच या कथा दाहक सत्य प्रखरतेने दर्शवितात. – ***प्रा. चंद्रज्योती भंडारी*** *समीक्षक, दै.लोकपत्र, नांदेड १ मार्च १९९२*

लघुतमकथा ह्या जपानी हायकु सारखा प्रकार वाटतो. थोड्या शब्दात जास्त अर्थ दाखविणारा हा प्रकार आहे. जीवनातील सर्व संदर्भ या कथांमधून चित्रित करण्यात आले आहेत. सरळ सोपी भाषा व चित्रमय प्रदर्शनामुळे अर्थपूर्ण असे हे पुस्तक तयार झाले आहे. – ***प्रा. बळवंत बडवे*** *दै. सत्यप्रभा, नांदेड २५ मार्च १९९२*

---




**मोरबांगडी –** अलिकडे शांताबाई शेळके यांनी लघुनिबंध या वांड्मयप्रकाराचे पुनरुजीवन केले आहे. तुम्हीही लघुनिबंधाच्या धारणीचं ललित गद्य लिहीत आहात. अनेक विषयांवरचे तुमचे लघुनिबंध वाचनीय आहेत. जीवनातल्या अनेक अनुभवांचे चित्रण करण्याची आणि त्यातून जीवनाची समज वाढविण्याचा प्रयत्न तुम्ही केला



**स्पर्श –** आपले लेखन खरोखरीच आवडले. कथेच्या आपल्या भाषेची जाण अभिनंदनीय वाटली. आपल्या भाषेला सखोलतेची चांगली देण लाभली आहे. ही भाषा सूक्ष्म संवेदना व स्पंदने नेमक पकडते. – ***आनंद अंतरकर, पुणे***

पुस्तक पहिले वहिले असले तरी लेखिका उदयोन्मुख आहे असे म्हणता येणार नाही. इतके छायाबाईंचे लेखन कसदार आहे. त्यांनी लघुकथेपेक्षा प्रदिर्घकथा किंवा कादंबरी लिहावी. अशी ताकद त्यांच्या सहज प्रतिभेत आहे हे जाणवले. लेखिकेची लेखणी तशी समर्थ आहे. – अनंतराव कुलकर्णी, प्रकाशक, काँटीनेंटल, पुणे

'स्पर्श' हा छाया महाजन यांचा कथासंग्रह वाचतांना मला सर्वात आधी प्रत्यय आला तो लेखिकेच्या साहित्यिक प्रगल्भतेचा. अनेक लेखक किंवा लेखिकांचे अनेक संग्रह प्रसिद्ध झाल्यानंतरही जी साहित्यिक प्रगल्भता जाणवत नाही ती यांच्या संग्रहात जाणवते. मला त्यांची कथा सांगण्याची पद्धत नवीन वाटली. वाचायला सुरवात केल्यावर दोन चार वाक्यात जाणवलं निवेदनाची ही ढब नवीन आहे. थेट, सरळ, सोपी थेट विषयाला भिडणारी, वाचकाला सरळ कथा प्रवाहात ओढून घेणारी, संग्रहातील पुष्कळ कथा पुरुष पात्रांच्या कथा आहेत आणि कथन प्रथम पुरुषी आहे. पुरुषांची मानसिकता आणि पुरुषी भाषाढंग छायाजींनी आतून समजावून घेतली आहे. – ***ह. मो. मराठे, १९८७***

प्रा. सौ.महाजन यांनी आपल्या कथांतून वेगवेगळे विषय हाताळले आहेत. त्यांच्या साहित्यात उत्कृष्ठ साहित्याची बीजे असलेली आढळतात. – ***डॉ. आनंद यादव*** *७ मार्च १९८६, दै.मराठवाडा, औरंगाबाद*

लेखिकेने अगदी सहजपणे कथा लिहिल्याचे जाणवते. जीवनाचा गांभीर्याने केलेला विचार त्यातून जाणवतो. त्यांच्या लेखनात कथेच्या 'फॉर्म'संबंधीची स्पष्ठता दिसते. आणि त्यात न अडकण्याचा सावधपणाही आढळतो. – ***डॉ. नागनाथ कोतापल्ले,*** *७ मार्च १९८६, दै.मराठवाडा.*

प्रभावी अशा प्रकारचे साहित्य आपण वाचत आहोत अशी जाणीव हे पुस्तक वाचताना निर्माण होते. यातील कथा लहान आहेत पण परिपुर्ण आहेत. माणसाच्या मनातील सूक्ष्म भावनात्मक संघर्ष टिपण्याचे प्रयत्न यात झालेले आहेत. हा एक सकस कथासंग्रह आहे. – ***डॉ. भगवंतराव देशमुख,*** *७ मार्च १९८६, दै. मराठवाडा, औरंगाबाद.*

---

**वळणावर –**


वळणावर हा कथासंग्रह खरोखरच वाचनीय व चांगला वाटला. त्यातील वळणावर ही कथा मला फार आवडली. – ***स्वप्नल ए. भाटे, पुणे***

अनुकरण, तुलना, योगायोग सादृष्य वगैरे आता छाया महाजन यांच्या लिखाणापासून कुठल्याकुठे मागे पडलेले आहे. मूळात तसे काही नसेलच/नव्हतेच. तुम्हाला अरविंद गोखल्यांची साक्ष देण्याचे कारण नाही. फॉर्म ज्याचा त्याचा स्वयंभू स्वतंत्र असतो आणि असावाच. – ***अनंतराव अं. कुलकर्णी,*** *२३/११/१९९१, नारायण गाव*

व्यक्तिंचा जीवनसंघर्ष दाखविण्याच्या उद्देशाने लेखिका समाजातिल भ्रष्टाचार, ढासळती नीतीमूल्ये यावर भाष्य प्रगट करते. अधोगती होत चाललेल्या समाज मनाचे नागडे उघडे चित्र अत्यंत संयमाने लेखिका आपल्या पुढे उभे करते. पुरुषापेक्षा वेगळे असे स्त्रीलाच उमगलेले स्त्रीचे दु:ख लेखिका मांडते. – ***वसुंधरा तारकर,*** *वाङ्मय शोभा, फेब्रु. १९९३*

या कथासंग्रहातून स्त्रीचं मन कसं असतं हे उलगडून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. जेवढे हक्क पुरुषाला मिळाले आहेत तेवढे हक्क अद्यापही स्त्रियांच्या वाट्याला आलेले नाहीत... हे दुष्ठचक्र हे समाज बंधन कधी कमी होणार हा प्रश्न देखील काही कथांमधून विचारला गेलाय. नव्या वाटा चोखाळणारा कथासंग्रह आहे. वादळी आव्हान स्विकारणारा असल्यामुळे तो वाचनीय व विचार करायला लावणारा आहे. – ***बळवंत बडवे,*** *नांदेड, २५ मार्च १९९२*

समाज मनाला एक चौकट असते. चौकटी बाहेर जाऊन जीवनाचा वेध घेणं चौकटीतल्या बधीर मनाला पटत नाही. स्त्रिच्या दुय्यम दर्जाची जाणीव तिला पदोपदी दिली जाते म्हणून स्वत:च्या अस्तित्वासाठी आजची स्त्री धडपडते आहे... मनात सलणारी दु:ख, वेदना ती मांडू पाहते आहे पण पुरुषप्रधान संस्कृतीत प्रत्येक वळणावर तिचा कोंडमाराच होतो. स्त्रियांच्या सामाजिक, मानसिक व्यथा, वेदना कुचंबणांची सरमिसळ म्हणजे वळणावर हा कथासंग्रह. – ***ससे***




### एकादश कथा -

डॉ. महाजन यांच्या कथांमध्ये स्त्रीयांचे प्रश्न वेगळेपणाने व धीटपणे मांडलेले आहेत. कथांमध्ये अनावश्यक तपशील नाही. त्यामुळे त्यांची बांधणी चांगली आहे.

### ओढ-




स्त्री विषयाच्या दृष्टीने कथा बहुरंगी असल्याचा प्रत्यय स्त्री लेखिका असूनही स्त्रीमुक्तीच्या भूमिकेतून न लिहीता मानवी मनाचे विविध भावभावनांचे चित्रण करण्यात छाया महाजन यांची कथा अधिक रमते-रंगते. स्त्री मुक्तीचे आकांड तांडव प्रगट करण्यापेक्षा स्त्री जीवनातील सुखदु:खाचे वास्तव चित्रण करणे हे छाया महाजन यांच्या कथेचे खास वैशिष्ट्य आहे. सर्व दृष्टीने ओढहा कथासंग्रह आगळ्या वेगळ्या अभिव्यक्तिचा प्रत्यय वाचकाला येतो. - ***दादा गोरे,*** *दै. लोकमत, ५/४/१९९८.*




### कॉलेज -

लेखिकेची तडफड, घुसमट कादंबरीच्या प्रत्येक पृष्ठावर व्यक्त होते. - ***वृंदा भार्गवे*** *(मटा.१४ जानेवारी २००७)*

कॉलेज ही पात्र प्रधान कादंबरी नसून समुह प्रधान कादंबरी आहे. समुहप्रधान असून बांधीव आहे. तिच्यातील सुक्ष्म कोलाहल आपल्या अंत:करणात तीव्र झंकार निर्माण करील त्यासाठी विकृतिची, लैंगिकतेची, रोमान्सची, उखडेल तंत्राची आणि पर्खल पॅचेसची तिला कुठेच आवश्यकता पडलेली नाही. - ***डॉ. द.भि. कुलकर्णी,*** *युगवाणी, एप्रिल-मे-जून २००७*

अत्यंत सहज सुंदर शैली आपल्याला लाभली आहे. वातावरण निर्मिती विषयाला अनुरुप असा आकार घेतघेत वाचकांची उत्कंठा वाढवते. या कादंबरीने वाचकांचे व समीक्षकांचे लक्ष वेधले गेले आहे. - ***लीला दिक्षित,*** *पुणे, ३०/१/२००७*


कादंबरीतील सगळे प्रसंग मुख्य विषय मुलाशी व्यवस्थितपणे गुंफले गेले आहेत. आज स्त्री पुरुष संबंधांच्या लैंगिक व्यवहारावर इतकं मोकळेपणी लिहीलं जात असताना तो विषय अस्पर्श ठेवून लेखिका कॉलेज विश्वातील स्टाफ मधील राजकारण अतिशय सुक्ष्मपणे मांडते.. भडक वर्णने टाळून गंभीरपणे लिहीलेली रंजनाच्या पलीकडे जावुन वास्तवाचे मोठ्या संयमाने चित्रित केलेली ही कादंबरी सनसनाटी नसून बळकट आशाय व्यक्त करते. - ***सुषमा लेले,*** *बडोदा.*

सध्याच्या महाविद्यालयीन वातावरणातील मूल्यहीनतेचा सर्वकष आलेख करणारी आणि अंतर्मुख करणारी सामर्थ्यशील कादंबरी आहे. - ***डॉ. राजश्री पवार हमणे,*** *फुलंब्री.*

मानवी मनाचे आपण फार प्रभावी आणि नेमके चित्रण केले आहे. - ***वि.द. अटकेकर,*** *पुणे, १२/१०/२००७*

कादंबरीतील व्यक्तिचित्र आणि घटना जीवंत वाटतात. ओघवत्या शैलीतून एखाद्या चित्रपटासारखी घटनांची शृंखला वाचकाच्या डोळ्यासमोरुन जाते. पुढे कादंबरी चिंतनाच्या पातळीवर पोचते. उल्लेखनीय म्हणजे लेखिकेने पाळलेली अलिप्तता. स्त्रि असूनही तिने कादंबरीतील सर्व पुरुषपात्रे पुर्णपणे विकसित केली आहेत. - ***मोरेश्वर देशमुख,*** *औरंगाबाद, म टा रविवार ४ फेब्रु. २००७*

पुस्तक वाचताना जब्बार पटेलांचा सिनेमा तर पाहत नाही ना असं वाटत. तुमच्या पुस्तकात अश्लिल काही नसतांना खिळवून ठेवण्याची ताकद आहे. - ***डॉ. शुभांगी पत्की,*** *पनवेल, २८/३/२००७*




### हरझॉग -

खुप तातडीच्या कामात गळ्यापर्यंत रुतलेला असुनही सहज चाळायला म्हणुन कादंबरी हातात घेतली ती संपुर्ण वाचुनच टाकली. कादंबरी विलक्षण आहे. अंतर्मुख करणारी आहे. या कादंबरीचे भाषांतर करून तुम्ही एक महत्त्वाचे कार्य केलेले आहे व त्याबल तुमचे मन:पुर्वक अभिनंदन. – ***निशिकांत मिरजकर**, दिल्ली*

सॉल बेलोच्या हरझॉग या कादंबरीतील प्रयोगशीलता समजुन घेणे ही सोपी गोष्ट नाही. तुमच्या या अनुवादाने हे आव्हान यशस्वीपणे पेलले आहे. म्हणुन मला तुमचे विशेष अभिनंदन करावेसे वाटते. यशस्वी अनुवाद करण्यासाठी मुळ लेखकाची संवेदनशीलता स्वत:ची बनवावी लागते. ती दत्तक घेऊन भागत नाही. तर तीला या आपल्या अनुवादात सॉलबेलोची संवेदनशीलता नव्याने जन्माला घालून एक नवनिर्मिती केल्याचे जाणवते. मराठीला एक सर्जक अनुवाद दिल्याबल मी तुमचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो. – ***डॉ. सुधीर रसाळ**, औरंगाबाद*

एक अभिजात कलाकृती मराठीत आणण्याचं मोलाचं कार्य आपण केलं त्याबल मी अभिनंदन करतो. – ***रविंद्र घवी**, गोवा*

सॉल बेलोच्या लेखनाची वैशिष्ठे या अनुवादात छानच उतरली आहेत. अनुवादासाठी तशी ही कादंबरी अवघडच आहे. पण तुम्ही हे शिवधनुष्य घेतले आहे. माझ्या अनेक मित्रांना ज्यांना इंग्रजी येत नाही आता मी हे पुस्तक रिकमेंड करू शकतो. – ***विजय पाडळकर**, नांदेड.*

एक मोठी महत्त्वाची कलाकृती मराठी आणुन तुम्ही वाचकाची फार मोठी सोय केलीत, मराठीचे दालन समृद्ध व्हायला हातभार लावलात. अनुवादाचे कार्य मी अतिशय महत्त्वाचे मानतो. त्यामुळे वाचक, समीक्षक, लेखक सर्वेच वेगळ्या विश्वात जातात. – ***चंद्रकांत बांदिवडेकर**, मुंबई.*

तुम्ही अगत्यपुर्वक पाठविलेले हरझॉग पुस्तक वाचले. अनुवाद चांगला वाटला, अभिनंदन. ***- डॉ. विजया राज्याध्यक्ष**, मुंबई*

असे लेखन भाषांतरीत अनुवादित करणे ही एक कसोटीच असते. आपण या कसोटीला पुरेपूर उतरला आहात. याबल आपले अभिनंदन. सॉल बेलोची ही कादंबरी आपल्या परिश्रमपुर्वक केलेल्या भाषांतरामुळे वाचण्याचा योग येत आहे. – ***मधुमंगेश कर्णिक**, मुंबई.*